संशोधन आराखडा

मराठवाड्यातील महिला व बाल विकासाच्या निवडक योजनांचे आर्थिक विश्लेषण : विशेष संदर्भ नांदेड जिल्हा (2010-11 ते 2021-22)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

मानव विज्ञान विद्या शाखेअंतर्गत पीएच.डी. पदवीसाठी अर्थशास्त्र विषयात सादर करायचा संशोधन आराखडा

: संशोधक :

चारलवाड नंदाबाई संतुका

अर्थशास्त्र (एम.ए.,सेट)

: मार्गदर्शक :

डॉ.राजेश्वर विश्वनाथ कीर्तनकार

सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,

नारायणराव वाघमारे महाविद्यालय, आखाडा बाळापूर

ता.कळमनुरी जि. हिंगोली.

2021

प्रस्तावना :-

10 डिसेंबर 1948 ला संयुक्त राष्ट्रसंघाच्या (युनो) सर्वसाधारण परिषदेने मानवी हक्काचा जागतिक जाहीरनामा (Universal Declaration of Human Rights) मंजुर केला; आणि जगात मानवी विकासाच्या चर्चेने जोर धरला. जागातील नव्याने स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांसमोर देशाच्या आर्थिक विकासासोबतच सामाजिक विकासाचे पण आव्हान होते. भारत देशाने हे आव्हान लोकशाहीच्या उदात्त मूल्यांचा त्याग न करता स्वीकारले. स्वतंत्र भारतात 26 जानेवारी 1950 पासून राज्यघटनेची अंमलबाजावणी सुरू झाली. भारतीय राज्यघटनेतील राज्यघटनेचा सरनामा हा नागरिकांसाठी चे मूलभूत हक्क आणि सरकारसाठी मार्गदर्शक तत्त्वे यासंबंधी आहे. देशाच्या राज्यघटनेचा सरनामा यामध्ये नागरिकांच्या सर्वांगिन विकासासाठी आणि अधिकारासाठी ज्या प्रकारची वचनबद्धता व्यक्त केलेली आहे; ती मुख्यतः मूलभूत अधिकार आणि मार्गदर्शक तत्त्वे याद्वारे व्यक्त केलेली आहे. मूलभूत हक्क यामुळे नागरिकांना मानवीय व नैसर्गिक हक्क प्राप्त होतात. तर मार्गदर्शक तत्त्वांमुळे सरकार वर नागरिकांच्या कल्याणाची जबाबदारी येऊन पडते. यामुळे भारताची राज्यघटना ही कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेची गुरूकिल्ली मानली जाते. स्वातंत्र्योत्तर भारतातील शासन प्रणाली ही खऱ्या अर्थाने कल्याणकारी शासन प्रणाली बनली आहे.

कल्याणकारी शासन प्रणाली म्हणजेच शासन व्यवहाराची अशी संकल्पना की, ज्यामध्ये राज्यसंस्था तिच्या नागरिकांच्या आर्थिक आणि सामाजिक कल्याणाच्या संरक्षण आणि संवर्धनामध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडते. ही संकल्पना संधीची समानता, संपत्तीचे समान वाटप व स्वतःचे जीवन चांगले बनविण्यामध्ये जो घटक सक्षम नाही त्यांच्याकरिता सार्वजनिक जबाबदारी घेते. त्यातूनच कल्याणकारी योजनांचा किंवा कार्यक्रमाचा प्रारंभ झाला भारतीय शासन प्रणाली ने सामाजिक कल्याणामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावण्यासाठी इ.स. 1950 पासून सुरूवात केली. भारतात सन 1951 पासून पंचवार्षिक योजनांची सुरूवात झाली. विविध कल्याणकारी योजनांचा समावेश या पंचवार्षिक योजनांमध्ये करण्यात आला. देशाचा आर्थिक, सामाजिक विकास घडवून आणणे हे प्रत्येक योजनेचे उद्दिष्ट होते.

देशाच्या आर्थिक विकासाला गतिमान करण्यासाठी भूमी, भांडवल, यंत्रसामुग्री, संयोजक आणि मानवी संसाधने या प्रमुख घटकांची आवश्यकता असते. या सर्व घटकांच्या प्रभावी संयुक्तिक करणावर आणि महत्तम योगदानावर विकासाची प्रक्रिया गतिमान होत असते, या सर्व घटकांमध्ये मानवी घटकाचे स्थान सर्वात महत्त्वाचे ठरते. कारण सर्व घटकाचा वापर करुन घेणारा मानव असतो. म्हणून मानवी संसाधन विकास ही कोणत्याही राष्ट्राच्या विकासाची पूर्व अट मानली जाते. त्यादृष्टीने विचार केल्यास भारताच्या लोकसंख्येचा निम्मा भाग असणाऱ्या महिलांचा विकास महत्त्वपूर्ण ठरतो. महिला व बाल विकास हा एकूणच सामाजिक आर्थिक विकासातील एक महत्त्वपूर्ण भाग आहे. भारतीय लोकसंख्येचा विचार करता 2011 च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्येच्या 48.5 टक्के महिला तर 13.12 टक्के 0 ते 06 वयोगटातील बालक आहेत. लहान बालक हे देशाचे भविष्य आहे तर महिलाही समाजाचा निम्मा भाग विकास प्रक्रियेचे दुसरे चाक आहे. या दोन घटकांच्या विकासाशिवाय राज्याच्या विकासाच्या कोणत्याही संकल्पनेला साकार रुप देता येणार नाही. म्हणुन शासनाने पहिल्या पंचवार्षिक 1951 ते 1956 या योजना काळात 1953 ला केंद्रीय समाज कल्याण बोर्डाची स्थापना केली. 14 जून 1964 समाज कल्याण विभागाची स्थापना केली. पुढे त्यांचे मंत्रालयात रुपांतरण झाले. दुसऱ्या पंचवार्षिक योजने पासून पाचव्या पंचवार्षीक योजनेपर्यंत (1956 ते 79) हा महिला व बाल कल्याणाचा दृष्टीकोन स्वीकारण्यात आला आणि त्याच बरोबर महिलांचे शिक्षण, गर्भवती स्त्रिया-बालकांच्या आरोग्यात सुधारणा इत्यादी सेवा उपलब्धतेवर सुद्धा भर देण्यात आला.

याच काळात जागतिक पातळीवर महिला व बालकांच्या मानवी हक्कासंबंधी विचार मंथनसुरू झाले UNICEF (1946), UNPE (1969) तसेच WHO (1948) या आंतरराष्ट्रीय संघटनांनी बालकांच्या विकासाशी संबंधित सर्व घटकांचा अभ्यास करुन; जगातील विकसनशील राष्ट्रात महिला व बालकांच्या समस्याकडे जगाचे लक्ष वेधले. कन्व्हेशन 1924 आणि बालकहक्क घोषणा 1959 चा आधार घेऊन बालकल्याण आणि बाल विकासाचे महत्त्व मान्य करुन 1979 ला आंतरराष्ट्रीय बालक वर्ष म्हणून घोषित केले. इ.स. 1975 मध्ये आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करुन महिला विषयी सहानुभूती निर्माण

करण्यात आली. सन 1975 ते 1985 महिला दशक वर्ष म्हणून साजरे करण्यात आले. आंतरराष्ट्रीय जागतिक महिला परिषदांचे आयोजन अनुक्रमे मेक्सिको 1975, कोपनहेगन 1980, नैरोबी सन 1985, बीजिंग सन 1994 आणि न्यूयॉर्क सन 2000 याप्रमाणे परिषदांचे आयोजन करण्यात आले होते. सन 2004-2005 मधील बिजींग येथे भरलेली महिला परिषद ही महिला व बालकांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची अशी ठरली. या सर्व परिषदांमध्ये महिलांचा दर्जा, शिक्षण, आरोग्य, समानता, संरक्षण, उत्पादनक्षमता, महिला रोजगार यासंदर्भात ध्येयधोरणे ठरविण्यात आली. महिलांच्या सामाजिक आर्थिक प्रश्नांची उकल करणे हे या परिषदांचे प्रमुख उद्दिष्ट होते. सन 1979 मध्ये संयुक्त राष्ट्रांची महिला विरोधातील सर्व प्रकारच्या विषमतेचे उच्चाटन परिषद (CEDAW) ही परिषद पार पाडली. या परिषदेने सर्व प्रकारच्या भेद भावापासून मुक्त असणे हा महिलांचा हक्क निश्चित केला (CEDAW) हा एकमेव असा मानवी हक्क आहे; ज्यामध्ये स्त्रियांच्या पुनरुत्पादन (रिप्रॉडक्टिव्ह) हक्काला मान्यता दिली.

यावरुन असे स्पष्ट होते की, जागतिक पातळीवर यासंदर्भात सर्वकष विचारमंथन करण्यात आले. अनेक आर्थिक लाभाच्या योजना राबविण्यात आल्या. महिला व बाल विकासाच्या जागतिक स्तरावरील प्रयत्नामुळे भारतात सुद्धा महिला व बाल विकासाच्या कार्याला गती मिळाली. भारतात महिला व बालकांसाठी अनेक कायदे तयार करण्यात आले. महिला व बालकांचा विकास घडवून आणणे आणि त्यांचे सक्षमीकरण साधने या हेतूने भारतात सन 1992 मध्ये राष्ट्रीय महिला आयोग व 25 एप्रिल 1993 ला महाराष्ट्र राज्य महिला आयोग स्थापन करण्यात आले. केंद्र व राज्य पातळीवर महिला धोरण व बाल धोरण राबविण्यात आले. 30 जानेवारी 2006 ला भारताने महिला व बालविकास मंत्रालयाची स्थापना केली. यामध्ये महिला व बालकांच्या संबंधित धोरण, कार्यक्रम, योजना, कायदे, मार्गदर्शन, विविध शासकीय तसेच गैर शासकीय संस्थांच्या कामात समन्वय करणे; यांचा समावेश आहे. केंद्र शासनाच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्याने 24 जून 1992 च्या अधिनियमान्वये महिला व बालकल्याण विभागाची निर्मीती केली; व 1999 मध्ये या विभागाचे नाव बदलून महिला व बालविकास विभाग असे केले. महिला व बालकल्याण योजनांचा लाभ समाजातील

शेवटच्या घटकापर्यंत पोहोचण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हा परिषदेमध्ये महिला व बालकल्याण विभागाची निर्मिती करण्यात आली. महिला व बालक हा समाजातील संवेदनशील घटक आहे.

समाजात स्त्रीला मानाचे स्थान मिळाले तर समाज तेवढाच प्रगतीशील आणि विकासित होत असतो. परिवार आणि समाजाच्या निर्मितीमध्ये महिलांची महत्त्वाची भूमिका असते. जेंव्हा समाज सशक्त आणि विकसित होतो. तेंव्हा राष्ट्राचा पण विकास जलदगतीने होतो. ज्या समाजात स्त्रियांचा दर्जा जोपासला जातो त्या समाजाचा विकास जलद गतीने होतो हे सांगताना विख्यात समाजशास्त्रज्ञ 'हर्बर्ट स्पेन्सर' म्हणतात की, समाजाची प्रगती अथवा अधोगती विकसित पणा अथवा मागासलेपणा हा मुख्यता त्या समाजातील स्त्रियांना दिल्या जाणाऱ्या वागणुकीवर अर्थात सामाजिक दर्जावर अवलंबून असतो. अशाप्रकारे राष्ट्राच्या निर्मितीप्रक्रियेत महिलांची केंद्रीय भूमिका ठरते. ''मातेच्या रुपात महिला प्रथम गुरू असते.'' जॉर्ज हर्बट च्या मतानुसार ''एक सुशिक्षित (चांगली) माता शंभर शिक्षकांच्या बरोबर असते'' त्यामुळे समाजात स्त्रीला सन्मान मिळाला पाहिजे.

वैदिक काळात भारतीय महिलांना कुटूंबात व समाजात मानाचे स्थान होते. स्त्री-पुरूष असा भेद नव्हता. अखंड भारत हा विदुशी महिलामुळे ओळखला जात होता. त्यात लोपामुद्रा, घोषा, गार्गी यांचा उल्लेख येतो. वेदकाळापासून आर्य काळापर्यंत अनेक स्त्री विदुषी भारतात निर्माण झाल्या. वैदिक काळात स्त्रीला घराची स्वामिनी मानले जात होते. परंतु वेदोत्तर काळात महिलांचे सामाजिक, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक अधिकार नाकारले गेल्याने महिलांचा सामाजिक दर्जा घसरला. समाजातील फार मोठा घटक विकासापासून वंचित राहिला नंतरच्या काळात म्हणजेच स्वातंत्र्यपूर्व काळात स्त्री सुधारणा चळवळीचा उदय झाला. महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, धोंडो केशव कर्वे, राजाराम मोहन रॉय, न्यायमूर्ती रानडे, राजर्षी शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर इत्यादी समाजसुधारकांनी आपल्या वैचारिक प्रबोधनातून, लिखाणातून व प्रत्यक्ष कृतीतून महिलांच्या विकासाला सुरूवात केली आणि स्वातंत्र्योत्तर भारतात वेगवेगळ्या योजनांच्या माध्यमातून शासनाने महिला व बाल विकासासाठी चालना मिळवून दिली. भारत स्वातंत्र्य होऊन जवळपास 73 वर्षे झाली आहेत. तरीपण महिला व

बालकांवरील होणारे अत्याचार कमी झाले नाहीत. ती नवीन स्वरुपात समोर येत आहेत. उदा. कुपोषण, बाल गुन्हेगारी, बालकामगार, स्त्रीभूणहत्या, बालमृत्यु, मातामृत्यु, महिला व बालकांचे लैंगिक शोषण, महिला व मुलींची विक्री, स्त्री-पुरूष भेद, कौटूंबिक आणि सामाजिक असुरक्षितता अशाअनेक बाबी आहेत. महिला व बालविकास हा एकूणच सामाजिक आर्थिक विकासातील एक महत्त्वपूर्ण भाग आहे. त्यामुळे भारतीय समाजव्यवस्थेत महिला व बालकांच्या स्थितीत शासकीय योजनांमुळे प्रगती झाली आहे का ? शिक्षणाच्या प्रमाणात वाढ झाली आहे का ? तसेच सरकारच्या नवीन कोणत्या योजना आहेत ? या योजनांचा आर्थिक लाभ महिला व बालकांना किती प्रमाणात होतो आहे. या योजनांचा अवलंब अशा प्रकारे होतो, महिला व बालकांना या योजनांचा कितपत फायदा होतो ? या अनुषंगाने महिला व बालकांच्या विकासाच्या योजनांचा अभ्यास करणे गरजेचे वाटले व त्यानुसार हा विषय संशोधनासाठी निवडण्यात आला.

प्रस्तुत संशोधन विषयात खालील निवडक योजनांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

निवडक योजना :

1. एकात्मीक बालविकास योजना
2. बाल संगोपन योजना
3. इंदिरा गांधी मातृत्व सहयोग योजना
4. मनोधैर्य योजना
5. जननी सुरक्षा योजना
6. बेटी बचाव बेटी पढाव योजना

अध्ययन विषयाचे महत्त्व :-

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून आणि महाराष्ट्राची निर्मिती झाल्यापासून महिला व बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र व राज्य सरकार विविध योजना राबवित आहेत. महिला व बालविकास एकूणच सामाजिक, आर्थिक विकासातील एक भाग आहे; म्हणून या योजनांचा लाभ घेणाऱ्या महिला व बालकांच्या आरोग्य तसेच आरोग्यविषयक सर्व सोयीसुविधा शहरी व ग्रामीण भागात योग्य प्रमाणात प्राप्त होत आहेत का ? त्यामुळे मातामृत्यू,

बालमृत्यु दरात घट झाली आहे का ? महिला व बालकांच्या साक्षरतेत वाढ झाली आहे का ? महिला व मुलींचे उच्च शिक्षण घेण्याचे प्रमाण वाढले आहे का ? यात समाज व कुटूंबाची मानसिकता कितपत बदलली आहे, महिला व बालकांच्या कुपोषणाचा दर घटला आहे का ? त्यांच्या राहणीमानाचा दर्जा सुधारला आहे का ? याचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने हा विषय फारच महत्त्वाचा ठरतो.

अभ्यास विषयाची निवड :-

स्वातंत्र्य पूर्व काळात महाराष्ट्राचा 21.08 टक्के क्षेत्र व्यापाणारा मराठवाडा प्रदेश हा दीर्घकाळ निजामी राजवटीखाली होता. इ.स.1729 ते 1948 या प्रदिर्घ कालावधीमध्ये या प्रदेशावर निजामी अमल होता. त्यामूळे इंग्रजी राजवटीतील उदार आर्थिक, सामाजिक, सुधारणांचा लाभ या प्रदेशातील जनतेला झाला नाही. त्यातही शिक्षणाचा अभाव रुढी-परंपरांचा पगडा तसेच सनातनी मनोवृती त्यामूळे या प्रदेशातील महिला व बालकांचा विकास साधता आला नाही.

नांदेड जिल्हा मराठवाड्यातील एकूण आठ जिल्ह्यांपैकी एक असून महाराष्ट्राच्या दक्षिणपूर्व सिमेला दक्षिणोत्तर परसरलेला आहे. महाराष्ट्र राज्याच्या एकूण क्षेत्रफळापैकी 3.41 क्षेत्र हे. नांदेड जिल्ह्याचे आहे.

2011 च्या जनगणनेनुसार, नांदेड जिल्ह्याची एकूण लोकसंख्या 33,61,292 आहे. त्यापैकी पुरुषांची संख्या 17,30,075 आहे आणि स्त्रियांची संख्या 16,31,217 आहे तर 0 ते 6 वयोगटातील बालकांची संख्या 4,59,572 एवढी आहे. नांदेड जिलळ्यात दर हजार पुरूषामागे 943 स्त्रियांची संख्या आहे. तर साक्षरतेचे प्रमाण 75.45 टक्के आहे. त्यापैकी 84.27 टक्के पुरूष साक्षरता आणि 66.15 टक्के एवढी कमी स्त्री साक्षरतेचे प्रमाण आहे. जिल्ह्याच्या एकूण लोकसंख्येपैकी 72.81 टक्के लोक ग्रामीण भागात राहतात. लोकसंख्येचा फार मोठा घटक ग्रामीण भागात राहतो. त्यामूळे तो विकासाच्या प्रक्रियेपासून दूर लोटला गेला आहे. लोकसंख्येचा निम्मा भाग असलेल्या महिला व बालक यांच्या विकासासाठी स्वातंत्र्योत्तर काळापासून केंद्र व राज्य शासन विविध योजना राबवत आहेत. या योजनांचा लाभ नांदेड जिल्ह्यातील सर्व घटकांतील महिला व बालकांना कितपत प्रमाणात झालेला आहे. याचे

अध्ययन करण्याच्या दृष्टीने हा विषय फारच महत्त्वाचा ठरतो यासाठी या विषयाची निवड करण्यात आली आहे.

संशोधन विषयाची उद्दिष्टे :-

कोणत्याही समस्येच्या संपूर्ण आकलनासाठी संशोधकाला त्या समस्येसंदर्भात काही उद्दिष्टे ठरवावी लागतात. तरच त्या संशोधनाला योग्य दिशा मिळते. त्यामुळे सदर विषयाच्या व्यवस्थित बांधणीसाठी व आकलनासाठी नांदेड जिल्ह्यातील महिला व बाल विकासाच्या निवडक योजनांचे आर्थिक विश्लेषण करण्यासाठी काही उद्दिष्टे ठरवली आहेत.

प्रस्तुत संशोधनासाठी खालील प्रमुख उद्दिष्टे निर्धारित करण्यात आली आहेत.

1) महिला व बाल विकासाच्या विविध योजनांचे अध्ययन करणे.
2) महिला व बालविकास योजना अंतर्गत नांदेड जिल्ह्यातील महिला व बालविकास विभागास, मिळालेल्या निधीचा अभ्यास करणे.
3) महिला व बाल विकास योजनांवर होणाऱ्या खर्चाचे अध्ययन करणे.
4) महिला व बाल विकास योजने अंतर्गत नांदेड जिल्ह्यातील महिला व बालकांच्या आर्थिक व सामाजिक जीवनावर झालेल्या परिणामांचे सविस्तर विश्लेषण करणे.
5) महिला व बाल विकास योजनांच्या अमलबजावणी मधील त्रुटींचे अध्ययन करुन उपाया योजना सुचविणे.

गृहितके :

संशोधन विषयासंबंधी असणाऱ्या पूर्व ज्ञानाच्या आधारे तसेच त्या विषयाच्या विविध पैलूंच्या केलेल्या अभ्यासाच्या आधारे संशोधक समस्येच्या निराकरणची संभाव्य उत्तरे शोधतो आणि त्यांच्या आधारे सिद्धांताची मांडणी करीत असतो या संभाव्य उत्तरांना किंवा अनुमानांना "गृहितकृत्ये" असे म्हणतात.

समाजशास्त्रज्ञ 'गुड आणि हॅट' यांच्या मते, "गृहितकृत्ये म्हणजे असे विधान आहे की, ज्याची सप्रमाणता ठरविण्यासाठी परीक्षण केले जाते आणि ते पुढील संशोधनासाठी उपयुक्त असते." यामुळे संशोधकाला आपले संशोधन योग्यरीतीने मार्गक्रमण करण्यास साहाय्यक

ठरते. म्हणून नांदेड जिल्ह्यातील महिला व बाल विकासाच्या योजनांचे आर्थिक विश्लेषण करण्यासाठी काही गृहीतके निश्चित केली आहेत ती पुढील प्रमाणे

1) महिला व बालकांच्या योजनेमुळे नांदेड जिल्ह्यातील कुपोषीत बालक व बाल मजुरांच्या प्रमाणात घट झाली आहे.
2) मातामृत्यू व बालमृत्यु यांच्या प्रमाणात घट झाली आहे.
3) ग्रामीण व शहरी भागातील महिला व बालविकास योजने अंतर्गत लाभार्थ्यांच्या संख्येत लक्षणीय फरक नाही.
4) महिला व बाल विकास योजने मुळे नांदेड जिल्ह्यातील महिला व मुली साक्षर होवुन स्ववलंबी होण्याचे प्रमाण वाढत आहे.

संशोधनाची व्याप्ती :-

प्रस्तुत संशोधनाचे क्षेत्र हे मराठवाड्यातील नांदेड जिल्ह्यापुरते मर्यादित असून या माध्यमातुन नांदेड जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या महिला व बालविकासाच्या योजनांचे आर्थिक विश्लेषण करण्यात येणार आहे.

संशोधन पद्धती :-

प्रस्तुत संशोधनात नांदेड जिल्ह्यातील महिला व बाल विकासाच्या निवडक योजनांचे आर्थिक विश्लेषण करण्यासाठी प्राथमिक व दुय्यम तथ्य संकलनाचा उपयोग करण्यात येणार आहे. यासाठी नमुना निवड करताना संभाव्यता नमुना निवड संशोधन पद्धती मधील साधा सादृच्छिक नमुना पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे.

नमुना निवड :

नांदेड जिल्ह्यातील 16 तालुक्यापैकी महिला व बालविकासाच्या योजनांचा सर्वाधिक लाभ घेतलेल्या निवडक तालुक्याची प्रत्यक्ष अध्ययनासाठी निवड करण्यात येईल. यासाठी एकुण 300 उत्तर दात्यांची निवड करण्यात येईल. हि निवड यादृच्छिक नमूना निवड पद्धतीने करण्यात येणार आहे.

तथ्य संकलन :

1) **प्राथमिक तथ्य संकलन :**

संशोधन विषयासाठी आवश्यक असलेले प्राथमिक तथ्य संकलन महिला व बाल विकास योजनांचा लाभ घेणाऱ्या महिला व बालकांची माहिती अनुसूचीद्वारे संकलन करण्यात येणार आहे.

2) **दुय्यम तथ्य संकलन :**

दुय्यम साधनसामुग्रीची माहिती संकलित करण्यासाठी संबंधित विषयाशी निगडीत असलेले संदर्भ ग्रंथ, पुस्तके, महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, आर्थिक व सामाजिक समालोचन, समाज कल्याण विभाग, महिला व बाल विकास विभाग, शासकीय प्रकाशन विभाग, शासकीय कार्यालय, जिल्हा सांख्यिकी कार्यालय, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्राचा जनगणना अहवाल, शासकीय संकेतस्थळे, वर्तमानपत्रे, मासिके यांचा आधार घेण्यात येणार आहे.

प्रकरणाची रुपरेषा :-

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अभ्यासासाठी प्रकरणांची मांडणी खालील प्रमाणे करण्यात आलेली आहे.

1) प्रकरण पहिले : प्रस्तावना
2) प्रकरण दुसरे : संदर्भ साहित्याचे सिंहावलोकन
3) प्रकरण तिसरे : महिला व बाल विकास योजनांची सद्यःस्थिती : भारत, महाराष्ट्र, मराठवाडा
4) प्रकरण चौथे : नांदेड जिल्हा एक दृष्टीक्षेप
5) प्रकरण पाचवे : नांदेड जिल्ह्यातील महिला व बालविकास योजनांच्या तथ्य संकलनाचे विश्लेषण
6) प्रकरण सहावे : निष्कर्ष व शिफारशी

प्रस्तुत प्रकरणात संशोधन अध्ययनातून मिळालेल्या माहितीच्या आधारे प्रमुख निष्कर्ष काढले जातील आणि त्यावर काही प्रमुख शिफारशी सुचविल्या जातील.

संदर्भ ग्रंथ सूची :

1) केंद्रीय समाज कल्याण बोर्ड महिला व बाल विकास विभाग महाराष्ट्र सरकार womanchild.maharashtra.gov.in
2) बाल धोरण-2014
3) Historicity Research Journal- वेदकालीन स्त्रीजीवन : डॉ. अमिता सोपान जावळे
4) मानवी हक्क : श्री दत्ता सांगोलकर
5) मानवी हक्क : तुकाराम जाधव / महेश शिरापूरकर
6) महिला सशक्तिकरण : भारत सरकार द्वारा किये जा रहे प्रयास : प्रतियोगिता दर्पण डिसेंबर-2015
7) मराठवाड्यातील मागासलेपण कधी पुसले जाणार : सकाळ वर्तमानपत्र
8) संशोधन पद्धती शास्त्र व तंत्रे- डॉ.प्रदीप आगलावे
9) मराठवाड्याच्या इतिहास-डॉ. आर.एस.कोंडेकर
10) इंडियन पोलिटी-एम.लक्ष्मीकांत
11) योजना मासिक- जुलाई-2015
12) महिला एवं बाल विकास प्रगती की आस-योजना मासिक सप्टेंबर 2015
13) लोकराज्य मासिक
14) www.unicef.org>india
15) www.loksatta.com
16) www.marathivishwakosh.org.
17) दृष्टीक्षेपात औरंगाबाद विभाग 2011-12
18) महिला धोरण 2014
19) नांदेड जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन-2016

संशोधक

चारलवाड नंदाबाई संतुका

अर्थशास्त्र (एम.ए.,सेट)

मार्गदर्शक

डॉ.राजेश्वर विश्वनाथ कीर्तनकार

सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,

नारायणराव वाघमारे महाविद्यालय, आखाडा बाळापूर

ता.कळमनुरी जि. हिंगोली.